~~सेव्य विभाग~~

<u>वाचले</u>: १) दि.३१/०१/२०२० चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माशि/१/कावि/१०० /२०२०,
दि.३१/०१/२०२०

विषय :- प्र.'मुख्याध्यापक' नेमणूक मुख्याध्यापक व शिपाई कर्मचारी यांच्या बदलीबाबत....

आदेश,

माध्यमिक शिक्षण विभागातंर्गत १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत.माध्यमिक विद्यालयांच्या प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजाच्या सोईच्या दृष्टीकोनातुन खालील कर्मचारी यांच्या बदल्या करणेत येत आहेत.तसेच माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर या विद्यालयातील श्रीम.इसकांडे सुनिता विजय मुख्याध्यापिका यांच्या झालेल्या रिक्त जागेवर प्रशासकीय व शालेय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सहा.शिक्षक यांच्या सेवाजेष्ठतेनुसार जेष्ठ शिक्षक श्री.नाडेकर बुधा काशिनाथ मा.वि.भोसरी यांना दिनांक ०१/०२/२०२० पासून तात्पुरत्या स्वरुपात माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर या विद्यालयांचे मुख्याध्यापक पदाचे अतिरिक्त कामकाज देणेत येत आहे.

| अ. क्र | कर्मचा-याचे नाव | पद | सध्याचे माध्यमिक विद्यालय | बदलीचे विद्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम.इसकांडे सुनिता विजय | मुख्याध्यापक | मा.वि.पिंपळेसौदागर | मा.वि.लांडेवाडी |
| २ | श्री.नाडेकर बुधा काशिनाथ | सहा.शिक्षक | मा.वि.भोसरी | मा.वि.पिंपळेसौदागर |
| ३ | श्रीम.बांबळे भारती बाळू | शिपाई | मा.वि.पिंपळेसौदागर | मा.वि.पिंपळेगुरव |
| ४ | श्रीम.कुलकर्णी जयश्री नंदकिशोर | शिपाई | मा.वि.पिंपळेगुरव | मा.वि.पिंपळेसौदागर |

सबब,मी शिक्षणाधिकारी,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८ या आदेशान्वये कामकाजाचे सोईचे दृष्टीने मुंबई प्रांतिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील प्रकरण ९ नियंत्रण ४८ (१) अन्वये आदेशाच्या दिनांकापासुन मुख्याध्यापक या पदाचा अतिरिक्त पदभार उपरोक्त नमूद केलेल्या सहाय्यक शिक्षक श्री.नाडेकर बुधा काशिनाथ यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात सोपविण्यास मान्यता देत आहे.सदरचा पदभार सोपविल्यामुळे मुख्याध्यापक या पदास यापूर्वी वेळोवेळी सोपविण्यात आलेले आधिकार यापुढे श्री.नाडेकर बुधा काशिनाथ यांनी वापरावेत, श्री.नाडेकर बुधा काशिनाथ सहाय्यक शिक्षक यांनी श्री.इसकांडे सुनिता विजय "मुख्याध्यापक" यांचेकडून लेखी स्वरुपात "मुख्याध्यापक" पदाचा चार्ज घेणेत येऊन त्याची एक प्रत मुख्य कार्यालयास सादर करावी. तसेच विद्यालयाच्या कुठल्याही प्रकारे चार्ज ची जबाबदारी श्री.नाडेकर बुधा काशिनाथ यांच्याकडे राहील,याची नोंद घ्यावी.तसेच उपरोक्त नमूद केलेले सहाय्यक शिक्षक यांचेकडे "मुख्याध्यापक"या पदाचा अतिरिक्त पदभार सोपविल्यामुळे त्यांनी त्यांचे मूळ पदाचे कामकाज संभाळून मुख्याध्यापक पदाचे कामकाज पुढील आदेश होईपर्यंत करावयाचे आहे.

उपरोक्त अ.क्र. ०१ तें ०४ ते कर्मचारी यांना नेमणूकीच्या ठिकाणी रूजू होणेकामी या आदेशान्वये तात्काळ कार्यमुक्त (Stand Release) करण्यात येत असून त्यांनी स्थानांतरण दिलेल्या विद्यालयात त्वरीत रूजू व्हावे उपरोक्त कर्मचारी यांना स्वत्रंत कार्यमुक्त करणेची आवश्यकता नाही.त्याच प्रमाणे उपरोक्त कर्मचारी यांनी बदली रद्द होणेबाबत कोणतेही प्रस्ताव माझेकडे सादर करू

Scanned by CamScanner

नये ते मान्य केले जाणार नाहीत. बदली रद्द होणेबाबत अथवा रूजू न होता परस्पर रजेवर गेल्यास संबधीत कर्मचा-या विरुद्ध दंडात्मक कारवाई करणेत येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

प्रति,
१)संबधीत कर्मचारी
माध्यमिक विद्यालय भोसरी / पिंपळेसौदागर / पिंपळेगुरव
२)मा.लेखाधिकारी लेखा विभाग

उपरोक्त कर्मचारी यांचे माहे – फेब्रवारी – २०२० चे वेतन बदली विद्यालयातुन अदा होईल याची दक्षता घेणेत यावी.

Scanned by CamScanner